शपथेवर सुरु
सरकारतर्फे साक्षीदार क्र.५ चा सरतपासः-
मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - पो.हे.कॉ.२२९/बबन हरिभाऊ तमनर,
वयः - ३५ वर्षे,
नेमणुक. - कोपरगाव शहर पोलिस स्टेशन, ता. कोपरगाव. जि.अ.नगर.
अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम. के. सोनवणे यांचे मार्फत सुरुः-

दि.०५/०८/२०२२ रोजी मी नेवासा पोलिस स्टेशनला पोलिस नाईक या पदावर कार्यरत होतो. सदर दिवशी मी पोलिस स्टेशनला हजर असताना मा. पो.नि. करे साहेब यांनी मला व पोलिस स्टाफला यांना बोलावुन कळविले की, नेवासा शहरात हरुन युनुस शेख याने हातात तलवार घेवुन सोशल मिडीयावर फोटो व्हायरल केलेला आहे, त्यास ताब्यात घेवुन कारवाई करा असा तोंडी आदेश दिला. त्यानंतर मी दोन पंचांना घेवुन पोलिस स्टाफसह हरुन युनुस शेख राहणार नाईकवाडी गल्ली, नेवासा येथे सदर इसमाच्या घरी गेलो. त्यावेळी हरुन युनुस शेख यास फोटो दाखवुन विचारपुस केली असता, त्याने सांगितले की, त्याने सदर तलवार १० ते १५ वर्षांपूर्वी शिवजयंती कार्यक्रमासाठी विकत घेतली होती. तलवारीबाबत विचारपुस केली असता, त्याने सदर तलवार पो.स्टे. ला हजर करतो असे सांगितले. त्यानंतर सायंकाळी ७.०० ते ८.०० वाजेच्या दरम्यान तो तलवार घेवुन पोलिस स्टेशनला आला. त्याप्रमाणे सदर तलवारीचा दोन पंचांसमक्ष सविस्तर पंचनामा केला. सदर तलवार ही अडीच फुट पाते असलेली व साडेसहा इंच मुठीची होती. आता मला तलवार जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी, आरोपीची व दोन पंचांच्या सह्या असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ३५ देण्यात येते. पंचनामा सायंकाळी ७.०० ते ८.०० वाजेच्या दरम्यान केला. ज्या आरोपीच्या ताब्यातुन तलवार जप्त केली त्याला पाहिल्यास मी ओळखु शकतो. आता मला जप्त मुद्देमाल पी.आर. नंबर ११६/२०२५ तलवार (एम.ओ.अ.) दाखवण्यात आली. ती तीच आहे. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ जे. बी. इनामदार यांचेमार्फत सुरु-

२) नेवासा पोलिस स्टेशनला मी सन २०१७ ते २०२४ पावेतो कार्यरत होतो. नेवासा पोलिस स्टेशन अंतर्गत वेगवेगळया बीटमध्ये मी कार्यरत होतो. नेवासा शहरात मी एक वर्षभर कार्यरत होतो. मी नेवासा शहरात डी.बी. मध्ये कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मला नेवासा शहराची चांगल्या प्रकारे माहिती होते. हे म्हणणे खरे आहे की, मला नेवासा शहरातील प्रतिष्ठीत डॉक्टर व पत्रकार यांची माहिती होती. आरोपीचे नाव नेवासा शहर शांतता कमिटीमध्ये आहे किंवा कसे याची मला माहिती नाही.

३) जप्त पंचनाम्यातील पंच हे पत्रकार आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे पंच

हे पत्रकार असल्याने त्यांचे पोलिस स्टेशनला नेहमी येणे-जाणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, पंचांची व माझी चांगल्याप्रकारे ओळख आहे. ज्यादिवशी सोशल मिडियावर तलवारीचा फोटो व्हायरल झाला त्यादिवशी मी नेवासा पोलिस स्टेशनला होतो. नेवासा पोलिस स्टेशन पासुन नाईकवाडी पुरा ही वस्ती एक ते सव्वा कि.मी. अंतरावर आहे. नेवासा पोलिस स्टेशनवरुन तिथे जाण्यासाठी ५ ते १० मिनिटांचा कालावधी लागतो. हे म्हणणे खरे आहे की, नाईकवाडापुरा वस्तीवर जवळजवळ घरे असल्याने गजबजलेला परिसर आहे.

४) आरोपीच्या घराचे दार कोणत्या दिशेला आहे हे मला आता सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, अशाप्रकारच्या तलवारी पोलिस स्टेशनला इतर गुन्हयातील मुद्देमाल म्हणुन असतात. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणत्याही प्रकारची तलवार जप्त केलेली नाही. जप्ती पंचनामा करण्यासाठी माझेकडे लेखी आदेश नाही. हे म्हणणे खरे आहे की, तलवारजवळ बाळगणे हा गंभीर स्वरुपाचा गुन्हा आहे. हे म्हणणे खरे नाही की, अशाप्रकारे कोणतीही घटना घडली नाही. गावातील प्रतिष्ठीत लोक व पोलिस स्टेशन यांचेमध्ये काही कारणास्तव नेहमी वाद होत असतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी शांतता कमिटीचे सदस्य असल्याने मी त्यांना चांगल्याप्रकारे ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, अशा प्रकारच्या तलवारी भंगाराच्या दुकानात मिळतात.

उलटतपास पुर्ण.फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा

दिनांक-०८/०१/२०२६.